महाराष्ट्र शासन

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय

मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१

जाहिरात क्रमांक १/२०२४

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभागातील रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित), उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब) (अराजपत्रित), निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब) (अराजपत्रित), संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

१.१ रचना सहायक (गट-ब)(अराजपत्रित) वेतनस्तर एस-१४, रु.३८६००-१२२८००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते (एकुण २६१ पदे)

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | सा.शे.मा.प्र | आ.दु.घ. | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ४७ | १८ | ०७ | १० | १० | ०७ | ०३ | ४४ | २६ | ३० | ५९ | २६१ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ३१ | १२ | ०५ | ०६ | ०६ | ०५ | ०२ | २९ | १७ | १९ | ३८ | १७० |
| (२) महिला | १४ | ०५ | ०२ | ०३ | ०३ | ०२ | ०१ | १३ | ०८ | ०९ | १८ | ७८ |
| (३) खेळाडू | ०२ | ०१ | -- | ०१ | ०१ | -- | -- | ०२ | ०१ | ०२ | ३ | १३ |
| (४) दिव्यांग | एकुण १२ पदे (चालू आरक्षणातील पदे - १० + अनुशेषाची पदे - २) | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | एकुण ०३ पदे [ संस्थात्मक २ पदे व संस्थाबाह्य १ पद] | | | | | | | | | | | |

(४) दिव्यांग:

| | | अनुशेषाची पदे | चालु आरक्षणातील पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|
| (a) | कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (D - Deaf, HH – Hard of Hearing) | -- | ०३ पदे | ०३ पदे |
| (b) | अस्थिव्यंगता/ मेंदुचा पक्षघात (OA - One Arm, OL - One Leg, BL - Both Leg, OAL - One Arm and One Leg, CP - Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (LC - Leprasy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (DW - Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (AAV - Acid Attack Victims) | -- | ०३ पदे | ०३ पदे |
| (c) | विशिष्ट शिक्षण अक्षमता (SLD – Specific Learning Disability) | ०१ पद | ०२ पदे | ०३ पदे |
| (d) | एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व वरील (a) ते (c) (MD – Multiple disabilities involving (a) to (c) above) | ०१ पद | ०२ पदे | ०३ पदे |
| | एकुण पदे | ०२ पदे | १० पदे | १२ पदे |

१.२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब)(अराजपत्रित) वेतनस्तर एस-१५, रु.४१८००-१३२३००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते (एकुण ०९ पदे)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शे.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ | ०१ | ०१ | ०३ | ०९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ०१ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०१ | -- | ०१ | ०२ | ०६ |
| (२) महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | ०३ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| (४) दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

१.३ निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब)(अराजपत्रित) वेतनस्तर एस-१४, रु.३८६००-१२२८००/- अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते (एकुण १९ पदे)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.शे.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ०२ | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | ०१ | ०४ | ०२ | ०२ | ०५ | १९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे | | | | | | | | | | | | |
| (१) सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | -- | ०१ | -- | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ०२ | १२ |
| (२) महिला | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| (३) खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| (४) दिव्यांग | एकुण ०१ पद<br>(a) अंधत्व (B-Blind) , अल्पदृष्टी (LV- Low Vision) — १ पद | | | | | | | | | | | |
| (५) अनाथ | -- | | | | | | | | | | | |

टिप -

१) भरावयाच्या उपरोक्त संवर्ग / पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणात तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२) वरील राखीव / बिनराखीव पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३) उपरोक्त रिक्त पदांपैकी काही पदे ही शासन नियमानुसार अनाथांसाठी व दिव्यांगांसाठी आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

- सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर अन्वये दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील मा.न्यायालयाच्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन प्रसिध्द करण्यात येत आहे. या जाहिराती संबंधित शिफारशी व नियुक्त्या उक्त उल्लेखित न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येतील.
- वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी ११.०० वाजल्यापासुन दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत |
| ३ | प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. |

टीप –

१. रचना सहायक, उच्चश्रेणी लघुलेखक व निम्नश्रेणी लघुलेखक या तिन्ही पदांसाठी ऑनलाईन परीक्षा स्वतंत्रपणे स्वतंत्र वेळापत्रकानुसार घेण्यात येतील. आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याबाबत वेळोवेळी विभागाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

२. उमेदवारांच्या संख्येस अनुसरून आवश्यकतेनुसार वेगवेगळया सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात येतील.

- सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता -

| अ.क्र | पद | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | रचना सहायक (गट-ब) (अराजपत्रित) | स्थापत्य अभियांत्रिकी किंवा स्थापत्य आणि ग्रामीण अभियांत्रिकी किंवा नागरी व ग्रामीण अभियांत्रिकी किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान या मधील मान्यताप्राप्त संस्थेची, तीन वर्षाची पदविका किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक. |
| २ | उच्चश्रेणी लघुलेखक (गट-ब) (अराजपत्रित) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आणि, लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र ही अर्हता धारण करणे आवश्यक. |
| ३ | निम्नश्रेणी लघुलेखक (गट-ब) (अराजपत्रित) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आणि, लघुलेखनाचा वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट आणि इंग्रजी टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट या अर्हतेचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र ही अर्हता धारण करणे आवश्यक. |

टिप - प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास उमेदवाराने संबंधित किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

- वयोमर्यादा :-

१) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास किमान वय १८ वर्ष पूर्ण असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी / खेळाडूंसाठी / आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी / सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गासाठी वयोमर्यादा ०५ वर्ष शिथिलक्षम राहील.) तसेच दिव्यांग व अनाथ उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

२) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

- परीक्षा शुल्क :-

| अराखीव (खुला) प्रवर्ग - १०००/- | राखीव प्रवर्ग - ९००/- |
|---|---|
| उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील. | |

- प्रस्तुत जाहिरात ही परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त जाहिरात असून अर्ज स्वीकारण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, परीक्षेचे स्वरुप, परीक्षा शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा सविस्तर तपशील दिनांक ३० जुलै, २०२४ रोजी www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील "सर्वसाधारण सूचना" या सदरामध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे त्याचे कृपया अवलोकन करावे.
- भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.
- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व या संदर्भातील त्यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

२४/०७/२०२४

(विजयकुमार ल. बायमोडे)
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

(अविनाश भा. पाटील)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.